महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३१६ वे | दिनांक : १७/११/२०२६ | वार : मंगळवार

महाराष्ट्राच्या सुरक्षेत मोठा बदल! 'फोर्स वन'चे नियंत्रण आता एटीएसकडे; राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय



मुंबई : महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने एक मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता राज्याच्या 'फोर्स वन' (Force One) या विशेष कमांडो युनिटचे प्रशासकीय आणि कार्यकारी नियंत्रण दहशतवादविरोधी पथकाकडे (ATS) हस्तांतरित करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या गृह विभागाने 16 नोव्हेंबर 2026 रोजी या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केला आहे.

राज्याची दहशतवादविरोधी यंत्रणा अधिक मजबूत, प्रभावी आणि समन्वित करण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या बदलानंतर 'फोर्स वन' आणि 'एटीएस' या दोन्ही प्रमुख सुरक्षा यंत्रणा आता एकाच नेतृत्वाखाली कार्यरत राहतील. यातून दोन्ही पथकांमध्ये उत्तम समन्वय प्रस्थापित करण्याचा गृह विभागाचा मानस आहे.

26/11 च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर अशा गंभीर घटनांना तोंड देण्यासाठी 'फोर्स वन'ची स्थापना करण्यात आली होती. दहशतवादी हल्ल्यांना तातडीने प्रत्युत्तर देणे, ओलिसांची सुरक्षित सुटका करणे आणि राज्यातील अतिमहत्त्वाच्या आस्थापनांचे संरक्षण करणे, यांसारख्या अत्यंत संवेदनशील जबाबदाऱ्या या विशेष कमांडो पथकावर आहेत.

दहशतवादी हल्ल्यांसारख्या आणीबाणीच्या प्रसंगी त्वरित आणि प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी या एकसंध नेतृत्वावर विशेष भर देण्यात आला आहे. 'फोर्स वन'चे नियंत्रण 'एटीएस'कडे आल्याने अत्यंत जलद गतीने निर्णय घेणे शक्य होणार असून, उपलब्ध सुरक्षा संसाधनांचा अधिकाधिक प्रभावी वापर करणे हे यामागील मुख्य उद्दिष्ट आहे.

नियंत्रण हस्तांतरित केले असले तरी, 'फोर्स वन' पथकाच्या विद्यमान पदरचना, मनुष्यबळ आणि आर्थिक तरतुदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, हे सरकारने स्पष्ट केले आहे. तसेच, राज्याच्या पोलीस महासंचालकांना (DGP) या नियंत्रण हस्तांतरणाची प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश गृह विभागाकडून देण्यात आले आहेत.

सेलिब्रिटींना माफियांच्या खुल्या धमक्या : हर्षवर्धन सपकाळ यांचा सत्ताधाऱ्यांना सवाल



मुंबई : राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून गुजरातच्या तुरुंगातून माफिया राज चालवले जात असल्याचा अत्यंत गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. "केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्रात असतानाही बॉलिवूड कलाकारांना माफियांच्या खुल्या धमक्या येत आहेत. अशा गंभीर परिस्थितीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पुण्यात काय फुगड्या घालत आहेत का?" असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. सोमवारी मुंबईतील टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी बॉलिवूडमधील दहशतीचे वातावरण, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक, राहुल गांधींचा दौरा आणि वैजापूरमधील रोहित पठारे हत्याकांडावरून केंद्र व राज्य सरकारवर चौफेर टीका केली.

राज्यातील गुंडगिरी आणि बॉलिवूडमधील भीतीच्या वातावरणावर भाष्य करताना सपकाळ यांनी केंद्र आणि राज्य सरकारला धारेवर धरले. बॉलिवूडमधील अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शकांना खुलेआम धमक्या दिल्या जात आहेत. अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर गोळीबार झाल्यानंतर आता महानायक अमिताभ बच्चन यांना लक्ष्य केले जात आहे. हल्ल्याच्या भीतीमुळे अमिताभ बच्चन यांना बुलेटप्रुफ काचेमागून आपल्या चाहत्यांना भेटावे लागत आहे, ही अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. नोटबंदीमुळे देशातील दहशतवाद आणि गुंडगिरी संपुष्टात येईल, असा दावा सरकारने केला होता. मात्र, आज दहशतवाद आणि माफिया राज अधिक जोमाने फोफावले आहे. काँग्रेसची सत्ता असताना कलाकार निर्भयपणे फिरत होते; आजची परिस्थिती पाहून जनता 'कोई लौटा दे मेरे बीते हुए दिन' असे म्हणत असल्याचा टोला त्यांनी लगावला. गुजरातच्या तुरुंगातून ही टोळी चालवली जात असून केंद्रीय गृहमंत्र्यांचा याला वरदहस्त असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

संसदेत येऊ घातलेल्या मतदारसंघ पुनर्रचना (डीलिमिटेशन) विधेयकावरून सपकाळ यांनी सरकारच्या हेतूवर शंका उपस्थित केली. या विधेयकामुळे लोकसभेतील खासदारांची संख्या 550 वरून थेट 850 पर्यंत वाढणार आहे. जर लोकप्रतिनिधींचीच संख्या वाढवायची असेल, तर केवळ खासदारांची संख्या का वाढवता? स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांची संख्याही वाढवली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. खासदार सुप्रिया सुळे यांनी या विधेयकाला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली असली, तरी काँग्रेस आणि इंडिया आघाडीचा या विधेयकाला पहिल्या दिवसापासूनच विरोध आहे आणि तो कायम राहील. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) या संदर्भात आवश्यक ती पावले उचलेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राहुल गांधी परदेशात जाऊन देशाची बदनामी करतात, या अमित शहा यांच्या टीकेला सपकाळ यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, "भारताची जगात बदनामी राहुल गांधींमुळे होत नाही, तर मोदी सरकारच्या मंत्र्याचे नाव एपस्टिन फाईलमध्ये आल्यामुळे होत आहे. विरोधी पक्षांचे नेते आणि न्यायाधीशांचे फोन पेगॅसस स्पायवेअरद्वारे टॅप केल्यामुळे, संसदेत विरोधी पक्षनेत्यांचा माईक बंद केल्यामुळे, तसेच देशातील वाढती महागाई, बेरोजगारी आणि भूक निर्देशांकामुळे भारताची प्रतिमा मलीन होत आहे." राहुल गांधींनी कन्याकुमारी ते काश्मीर अशी 4500 किलोमीटरची पदयात्रा काढून कष्टकरी, शेतकरी, हमाल आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला आहे. आता अमित शहा यांनीही आपली सुरक्षा बाजूला सारून सामान्य जनतेत मिसळावे, असा सल्ला त्यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथील तरुण रोहित पठारे याच्या हत्येप्रकरणी सपकाळ यांनी पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या प्रकरणात अटक केलेल्या आरोपींची ओळख परेड अद्याप कुटुंबियांसमोर करण्यात आलेली नाही, उलट पठारे कुटुंबियांनाच धमक्या दिल्या जात आहेत. राज्यात अशा प्रकारच्या निर्घृण हत्या होत असताना देवेंद्र फडणवीस यांना गृहमंत्री पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, असे ते म्हणाले. हर्षवर्धन सपकाळ उद्या वैजापूर येथे जाऊन रोहित पठारे यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेणार आहेत.

या पत्रकार परिषदेदरम्यान हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते महाराष्ट्र नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडियाच्या (एनएसयूआय) 'शिक्षण वाचवू, पर्यावरण वाचवू, लोकशाही वाचवू' या राज्यव्यापी अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. वृक्षसंवर्धन, पर्यावरण रक्षण आणि शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराविरोधात संघटना राज्यभर आंदोलन छेडणार असून, आगामी विधिमंडळ अधिवेशनावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. याप्रसंगी विधान परिषदेचे आमदार अभिजित वंजारी, माजी आमदार वजाहत मिर्झा, राहुल बोंद्रे आणि एनएसयूआयचे प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे आदी नेते उपस्थित होते.

वडेट्टीवारांना खासगीत विचारलं तर तेही म्हणतील मतदारसंघ पुनर्रचना झालीच पाहिजे : चंद्रशेखर बावनकुळेंचा टोला



नागपूर : मतदारसंघ पुनर्रचनेच्या (डीलिमिटेशन) मुद्द्यावरून सुरू असलेल्या राजकीय वादात राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेस नेत्यांवर जोरदार निशाणा साधला आहे. "विजय वडेट्टीवार किंवा नाना पटोले यांना खासगीत विचारले, तर तेही सांगतील की विकासासाठी मतदारसंघांची पुनर्रचना झालीच पाहिजे. मात्र, त्यांचे नेते राहुल गांधी फटकारतील या भीतीने ते उघडपणे बोलत नाहीत," असा सणसणीत टोला बावनकुळे यांनी लगावला आहे. सोमवारी (१६ नोव्हेंबर) माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी मतदारसंघ पुनर्रचना, आदिवासी शेतकऱ्यांना मालकी हक्काचा 'सात-बारा ही' देण्याची मोहीम, १५ लाख शेतकऱ्यांना फार्मर आयडी, दुष्काळ निवारण आणि हिवाळी अधिवेशनातील काटकसर यांसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर भाष्य केले.

मतदारसंघ पुनर्रचनेचे समर्थन करताना बावनकुळे यांनी प्रत्यक्ष लोकप्रतिनिधींना येणाऱ्या अडचणी मांडल्या. ते म्हणाले की, सध्या एक-एक लोकसभा मतदारसंघ ३०० किलोमीटरपर्यंत पसरलेला आहे, तर विधानसभा मतदारसंघ १५० किलोमीटरचे आहेत. एवढ्या मोठ्या मतदारसंघात खासदार किंवा आमदार जनतेशी संपर्क कसा साधणार आणि विकासकामे कशी करणार? मतदारसंघ जेवढे लहान होतील, तेवढा विकास अधिक वेगाने होईल. जे सध्या लोकसभा किंवा विधानसभेत प्रतिनिधित्व करत नाहीत, त्यांना या अडचणींची कल्पना नसते, असा टोलाही त्यांनी नाव न घेता विरोधकांना लगावला. तसेच, राहुल गांधी यांनी परदेश दौऱ्यात जाऊन भारताची ताकद जगाला दाखवावी, मात्र भारताची बदनामी करू नये, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

महसूल विभागाने राज्यातील आदिवासी समाजाच्या शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयाची माहिती बावनकुळे यांनी दिली. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच राज्यातील सर्व वनपट्टाधारक आदिवासी शेतकऱ्यांना सर्वसाधारण शेतकऱ्यांच्या सातबाऱ्याप्रमाणेच 'सात-बारा ही' नावाचे मालकी हक्काचे प्रॉपर्टी कार्ड दिले जात आहे.राज्यातील ११ जिल्ह्यांतील किमान ३५ विधानसभा मतदारसंघांमध्ये ही मोहीम राबवली जाणार असून, १५ डिसेंबरपर्यंत सर्व पात्र आदिवासींना वनपट्टा आणि 'सात-बारा ही' वाटपाचे काम पूर्ण केले जाईल. मालकी हक्क मिळाल्यामुळे आता आदिवासी शेतकऱ्यांची धान खरेदी शासनामार्फत होऊ शकेल, तसेच त्यांना पीक विमा, नुकसान भरपाई, बँक कर्ज आणि किसान सन्मान यांसारख्या केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांचा थेट लाभ मिळेल.

राज्यात असे सुमारे १५ लाख शेतकरी आहेत, जे पिढ्यानपिढ्या जमीन कसत आहेत, मात्र तांत्रिक कारणांमुळे त्यांच्या नावावर मालकी हक्क किंवा 'फार्मर आयडी' नाही. यामध्ये विदर्भातील भूदान व सिलिंग लँड, मराठवाड्यातील निजामाची मदत-मास व खिदमत-मास जमीन, उत्तर महाराष्ट्रातील जहागीरदार जमीन, पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थान इनाम जमीन तसेच पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमधील कष्टकरी शेतकऱ्यांचा समावेश आहे. १ जानेवारी २०१५ पूर्वीपासून जमीन कसत असल्याचा किंवा कृषी उत्पन्न बाजार समितीत माल विकल्याचा पुरावा असलेल्या या सर्व १५ लाख शेतकऱ्यांना सरकारने 'फार्मर आयडी' देण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य सरकारने ११ महत्त्वाच्या विभागांच्या माध्यमातून ४५ ते ४६ मोठे निर्णय घेतले आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीतून सिमेंट रस्ते व गट्टू यांसारखी अनावश्यक कामे कमी करून जलसंधारण आणि चारा-पाणी टंचाई निवारणाच्या १५ ते १६ उपाययोजनांना प्राधान्य दिले जात आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला या कामांसाठी १५ ते २० लाख रुपये दिले जातील. तसेच, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या सूचनेनुसार, 'वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड' (डब्ल्यूसीएल) आणि 'मॉईल'च्या खाणींमधून उपसले जाणारे अफाट पाणी नदी-नाल्यात सोडून न देता, ते प्रक्रिया करून शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि पिण्यासाठी कसे वापरता येईल, याचा आराखडा तयार केला जात असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. केंद्राकडून एनडीआरएफच्या मदतीचा पहिला हप्ता आला असून, उर्वरित हप्तेही नियमानुसार टप्प्याटप्प्याने मिळतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६

महिलांनी शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणी करावी : सुनीता पावशेरे



कलदेव निंबाळा : (प्रा.नागसेन कांबळे) येथे नुकतेच महिला शेतकरी प्रमाणपत्र वितरणास प्रारंभ करण्यात आला असून आतापर्यंत २५२ महिलांची ऑनलाइन नोंदणी करण्यात आली आहे.महिलांना शेतीविषयक व ईतर शासकीय योजनांचा लाभ मिळावा, विविध कृषी अनुदाने, नुकसान भरपाई तसेच बँकेच्या माध्यमातून मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घेता यावा, यासाठी गावातील सर्व महिलांनी शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन ग्रामपंचायत गटनेत्या सुनीता देविदास पावशेरे यांनी केले.कलदेव निंबाळा येथे ऑनलाइन नोंदणी केलेल्या महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वितरणाचा प्रारंभ(दि. 16)करण्यात आला. ग्रामपंचायत गटनेत्या सुनीता देविदास पावशेरे व कृषी सहाय्यक ज्योती कदम यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयात महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.कलदेव निंबाळा येथील एकूण २५२ महिलांनी महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. नोंदणी केलेल्या उर्वरित सर्वच महिलांनाही लवकरच प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येईल, अशी माहिती कृषी सहाय्यक ज्योती कदम यांनी यावेळी दिली.यावेळी बोलताना सुनीता पावशेरे म्हणाल्या की, महिला शेतकऱ्यांनी शासकीय व ईतर योजनांपासून वंचित राहू नये, यासाठी प्रत्येक महिलेने त्वरित ऑनलाइन नोंदणी करून शेतकरी प्रमाणपत्र मिळवावे. या प्रमाणपत्रामुळे विविध शासकीय योजना, कृषी योजना, अनुदान आणि नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या शेती व ईतर नुकसानीच्या भरपाईसाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेत मदत होऊ शकते. त्यामुळे अधिकाधिक महिलांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा.ऑनलाइन नोंदणी केलेल्या बळीराजा शेतकरी बचत गटाच्या १३ सदस्य महिलांना गहू बियाण्यांचे वाटपही करण्यात आले.यावेळी सुनीता कुलकर्णी, प्रभावती कुलकर्णी, सविता स्वामी, सखु बिराजदार, सोनाली चिंचोले, सोनाली दळवे, सरोजा दासमे, अंबिका बिराजदार, अमृता बलसुरे, गंगुबाई साळुंखे, चंदा बोकडे, रुक्मिणी घोटमाळे, लक्ष्मी गुगळगावे, सुनीता पाटील, सुनीता सूर्यवंशी, संध्या गायकवाड, तेजाबाई कारभारी यांच्यासह गावातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ऐका जरा !

दगडात देव । नाही मिळणार ।
कधी कळणार । मानवाला ।।१।।

माय बाप सेवा । सतत करावे ।
आनंद भरावे । जीवनात ।।२।।

देवाच्या रूपात । मायबाप तुझे ।
सांगणे हे माझे । ऐका जरा ।।३।।

तन मन धन । अर्पण करावे ।
सुखात ठेवावे । माय बाप ।।४।।

काम करा असे । लाभो समाधान ।
वाटे अभिमान । सर्वकाळ ।।५।।

माय बाप सेवा । सदा सुख देई ।
मदतीस येई । कर्म तुझे ।।६।।

नागेश सांगतो । अभंगात सत्य ।
कर सेवा नित्य । मनोभावे ।।७।।

नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

लातूर ग्रामीण भाजपा कार्यालयात भगवान बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी



लातूर (प्रा. सुधीर पंचगल्ले) : भारतीय जनता पार्टीच्या लातूर ग्रामीण कार्यालयात आज आदिवासी जननायक, क्रांतीसूर्य भगवान बिरसा मुंडा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्याला आणि त्यांनी आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी व देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाला उजाळा देण्यात आला.

या कार्यक्रमास श्री. बसवेश्वर धाराशिवे, श्री. शिरीष आप्पा उटगे, श्री. संगमेश्वर ठेसे, श्री. सज्जन लोणारे, श्री. मधुसूदन पारेख, श्री. गजानन मल्लाडे, श्री. महादेव यादव, श्री. मल्लाडे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सावता कृषी सेवा केंद्राला भीषण आग; ५१ लाख ९५ हजाराचे नुकसान



दौलताबाद (जावेद अहमद) : मुंबई नाशिक महामार्गावर माळीवाडा येथील सावताॲग्रो सर्व्हिसेस' या कृषी सेवा केंद्राला रात्री १०.३० ते ११ वाजेच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या आगीत दुकानातील खते, कीटकनाशके आणि बियाणे जळून खाक झाले असून, या घटनेत सुमारे ५१ लाख ९५ हजाराचे रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती दुकान मालक चंद्रकांत हेकडे यांनी दिली आहे.नेमकी घटना कशी घडली?दुकान मालक चंद्रकांत हेकडे आणि त्यांचे कुटुंब दुकानाच्या वरच्या मजल्यावर राहतात. रात्री ११ वाजेच्या सुमारास जेवण करून आराम करत असताना त्यांना धुराचा वास आला आणि लहान फटाके फुटल्यासारखा आवाज ऐकू आला. सुरुवातीला बाहेर कोणीतरी फटाके फोडत असावे, असे त्यांना वाटले. मात्र, खाली येऊन पाहिले असता दुकानाने पेट घेतल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.ग्रामस्थांची धाव आणि मदतकार्यआगीची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरताच गावमधील सुमारे ५०० ते ७०० ग्रामस्थ तात्काळ मदतीसाठी घटनास्थळी धावले. ग्रामस्थांनी आपापल्या घरून पाणी आणून शर्थीचे प्रयत्न केले आणि आग आटोक्यात आणली. अग्निशमन दलाला या घटनेची माहिती देण्यात आली होती; मात्र दलाचे बंब घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच ग्रामस्थांनी एकत्रित प्रयत्नांतून आग पूर्णपणे विझवली होती.

सुरक्षेसाठी मुंबई नाशिक महामार्ग एक तास बंद ठेवण्यात आले होतेमुख्य विद्युत पुरवठा बंद करण्यात आला होतामोठे नुकसान, पण जीवितहानी टळलीया आगीत अदामा, सिजेंटा, बायर, कॉर्टेवा, एन्वा आणि बेस्ट ॲग्रो यांसारख्या नामांकित कंपन्यांची महागडी औषधे, खते, कीटकनाशके व बियाणे मोठ्या प्रमाणात जळून खाक झाले आहेत. सुदैवाने, वरच्या मजल्यावर राहणारे हेकडे कुटुंब वेळीच बाहेर पडल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६

पदापेक्षा व्यक्तिमत्व मोठे ठेवा

सेवानिवृत्तीनंतर एका IAS अधिकाऱ्याला जाणीव झाली की, आपण तर गाढव होतो!नुकताच सोशल मीडियावर एका सेवानिवृत्त IAS अधिकाऱ्यांनी दिवाळीनिमित्त लिहिलेला एक लेख वाचण्यात आला.त्यांनी लिहिले होते की, सेवानिवृत्तीनंतरची ही माझी पहिली दिवाळी होती. नोकरीत असताना दिवाळीच्या आठवडाभर आधीपासूनच लोक वेगवेगळ्या प्रकारच्या भेटवस्तू घेऊन येण्यास सुरुवात करायचे.भेटवस्तूंचे प्रमाण इतके असायचे की, ज्या खोलीत त्या ठेवल्या जायच्या, ती खोली एखाद्या दुकानासारखी दिसू लागायची. सुकामेवा इतका यायचा की, नातेवाईक, मित्रमंडळी आणि नोकरांना वाटल्यानंतरही बरेच सामान शिल्लक राहायचे.परंतु सेवानिवृत्तीनंतरच्या या पहिल्या दिवाळीत दुपारचे दोन वाजून गेले होते, तरीही कोणीही आम्हाला दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी आले नव्हते.लोकांच्या या बदललेल्या वागणुकीचे मला खूप आश्चर्य वाटले. या मानसिक अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी मी एका वर्तमानपत्रातील सदर वाचू लागलो. सुदैवाने त्यामध्ये मला एक रंजक गोष्ट वाचायला मिळाली.ती गोष्ट एका गाढवाची होती.एक गाढव होते. त्याचा मालक धार्मिक पूजाविधीसाठी देवी-देवतांच्या मूर्ती त्याच्या पाठीवर लादून घेऊन जात होता.रस्त्यातून गावांमधून जात असताना लोक त्या मूर्तींसमोर नतमस्तक होत होते. पूजा-अर्चा करण्यासाठी लोकांची गर्दी जमायची.हे पाहून गाढवाला वाटू लागले की, लोक आपल्यालाच नमस्कार करत आहेत. लोकांकडून मिळणाऱ्या या आदरामुळे आणि सन्मानामुळे ते खूप आनंदी आणि गर्विष्ठ झाले.मूर्ती पूजास्थळी पोहोचवल्यानंतर परतीच्या प्रवासात मालकाने गाढवाच्या पाठीवर भाजीपाल्याची पोती लादली आणि दोघेही परतीच्या मार्गाला लागले.यावेळी मात्र कोणीही गाढवाकडे लक्ष दिले नाही.हे पाहून ते अज्ञानी प्राणी खूप निराश झाले. लोकांचे लक्ष स्वतःकडे वेधून घेण्यासाठी ते वारंवार ओरडू लागले. त्याच्या ओरडण्यामुळे लोक त्रस्त झाले आणि मालकानेही त्याला मारायला सुरुवात केली.आपल्याकडून असे काय चुकले की, लोक आपल्याशी असे वागत आहेत, हे त्या गाढवाला समजत नव्हते!ही गोष्ट वाचल्यानंतर मला अचानक एक फार मोठी शिकवण मिळाली. मला जाणवले की, आजपर्यंत मीसुद्धा त्या गाढवासारखाच वागत होतो.मला मिळणारा मान-सन्मान, आदर आणि भेटवस्तू या माझ्यासाठी नव्हत्या, तर माझ्या पाठीवर लादलेल्या त्या पदरूपी मूर्तीसाठी होत्या, जिच्यावर मी स्वार झालो होतो.जेव्हा मला या सत्याची जाणीव झाली, तेव्हा लोकांची वाट पाहण्याऐवजी मी माझ्या पत्नीसोबत दिवाळी साजरी करण्याचा निर्णय घेतला.परंतु इतक्या वर्षांनंतर आता तीदेखील माझ्यासोबत दिवाळी साजरी करण्याच्या मनःस्थितीत नव्हती.ती म्हणाली,"मी इतकी वर्षे तुम्हाला समजावून सांगत होते की, तुम्ही गाढवापेक्षा काही वेगळे नाहीत, तेव्हा तुम्ही माझे कधीच ऐकले नाही. पण आज वर्तमानपत्रातील एका गोष्टीने तुम्हाला सत्याची जाणीव करून दिली!"म्हणूनच, जेव्हा तुम्ही एखाद्या पदावर असता, तेव्हा आपल्या पदाचा, प्रतिष्ठेचा आणि अधिकारांचा अहंकार न बाळगता मित्र, नातेवाईक आणि समाजातील परिचित व्यक्तींशी नम्रतेने वागायला शिका.आपल्या सहकाऱ्यांचा आदर करायला शिका. अन्यथा पदावरून पायउतार झाल्यानंतर तुमचीही अवस्था त्या गाढवासारखी होऊ शकते.जेव्हा एखादी व्यक्ती नोकरीत उच्च पदावर असते, राजकीय सत्तेत किंवा राजकीय संघटनेत महत्त्वाची जबाबदारी सांभाळत असते किंवा एखाद्या सामाजिक, शैक्षणिक अथवा सहकारी संस्थेत उच्च पदावर विराजमान असते, तेव्हा अनेकदा त्या व्यक्तीला तिच्या वास्तविक पात्रतेपेक्षा अधिक मान-सन्मान मिळू लागतो.कार्यक्रमांचे अध्यक्षस्थान भूषविण्याच्या आणि प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याच्या संधी मिळतात. स्वागत आणि सत्कारामुळे व्यक्तीचा अहंकार वाढू लागतो.कधीकधी संधी मिळताच अशी व्यक्ती इतरांना धमकावते, त्यांचा अपमान करते आणि आपल्या भोवती चापलूस व खुशमस्कऱ्यांची गर्दी जमवते.असे लोक गुणी, प्रतिभावान आणि कर्तृत्ववान व्यक्तींची उपेक्षा करतात, एवढेच नव्हे तर त्यांना त्रासही देतात.परंतु जेव्हा ते सेवानिवृत्त होतात किंवा त्यांचे पद, प्रतिष्ठा आणि सत्ता संपुष्टात येते, तेव्हा परिस्थिती पूर्णपणे बदलते.त्यांना एकटेपणा आणि पोकळी जाणवू लागते. आपल्या अहंकारी वृत्तीची आणि चुकीच्या वागणुकीची जाणीव झाल्यामुळे त्यांना पश्चात्ताप होऊ लागतो.आयुष्यात कधी त्यांच्या हातून त्रास सहन केलेल्या किंवा त्यांच्या चुकीच्या वागणुकीचे बळी ठरलेल्या व्यक्तींशी त्यांची भेट झाली, तर त्या व्यक्तीदेखील त्यांना त्यांच्या पूर्वीच्या वागणुकीची आठवण करून देण्याची संधी सोडत नाहीत.अशा व्यक्तींबद्दल मनात आदराऐवजी द्वेषाची भावना दिसून येते. पद गेल्यानंतर अनेक जण त्यांची निंदानालस्ती करण्यासही मागेपुढे पाहत नाहीत.माणसाचा नम्रपणा आणि साधेपणाच त्याचे जीवन समाधानी, अर्थपूर्ण आणि यशस्वी बनवतो. हाच जीवनाचा खरा मूलमंत्र आहे.हा लेख सत्य घटनेवर आधारित आहे की काल्पनिक आहे, हे महत्त्वाचे नाही. माझ्या अनुभवानुसार, त्यामध्ये सांगितलेल्या गोष्टी शंभर टक्के सत्य आहेत.जेव्हा जेव्हा तुम्हाला एखादे पद, प्रतिष्ठा किंवा सत्ता मिळेल, तेव्हा आपले वर्तन असे ठेवा की, लोकांनी तुम्हाला तुमच्या चांगल्या स्वभावामुळे, नम्रतेमुळे आणि प्रामाणिकपणामुळे कायम लक्षात ठेवावे.कारण पद आणि खुर्ची कधीही कायमस्वरूपी नसतात.पदावरून पायउतार झाल्यानंतर लोक अनेकदा त्या खुर्चीवर नियुक्त झालेल्या नवीन व्यक्तीचा सन्मान करू लागतात आणि त्या खुर्चीवरून खाली उतरलेल्या व्यक्तीची आठवणसुद्धा ठेवत नाहीत.म्हणूनच असे व्यक्तिमत्त्व घडवा की, लोकांनी तुमचा आदर तुमच्या पदामुळे नव्हे, तर तुमच्या चांगल्या वागणुकीमुळे आणि माणुसकीमुळे करावा.एका सेवानिवृत्त IAS अधिकाऱ्याचा अनुभवया लेखातून मिळणारी शिकवण."पदापेक्षा व्यक्तिमत्त्व मोठे ठेवा आणि अधिकारापेक्षा आपले वर्तन मोठे ठेवा."खुर्चीवर असताना मिळणारा मान हा खुर्चीचा असतो; पण खुर्ची सोडल्यानंतरही मिळणारा मान हा तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा असतो.म्हणूनच पदाचा गर्व करू नका, माणुसकीचा ठेवा. कारण पद संपते, सत्ता संपते, अधिकार संपतात; पण चांगल्या वागणुकीने माणसांच्या मनात निर्माण केलेले स्थान कायम राहते.पद मिळवणे हे यश असू शकते; पण पद गेल्यानंतरही माणसांच्या मनात आदराचे स्थान टिकवणे, हेच खरे कर्तृत्व आहे!



~ प्रा.डॉ राजेंद्र सोनवणे, जालना

धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती निरगुडी बु. ठाकरवाडी व ग्रामपंचायत कार्यालयात उत्साहात साजरी!



खुलताबाद (सनिराम गावंडे) : आदिवासी समाजाचे महान क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक आणि अन्याय-अत्याचाराविरुद्ध लढा देणारे धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांची १५१ वी जयंती १५ नोव्हेंबर रोजी निरगुडी बु. ठाकरवाडी येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या जयंतीनिमित्त ठाकरवाडी येथील राया ठाकर चौकात भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बु. येथेही भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.त्यावेळी सनिराम गावंडे अध्यक्ष आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य शाखा खुलताबाद तालुका ,बाळू मधे सचिव आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य शाखा खुलताबाद, बबन कातवारे संपर्क प्रमुख आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य शाखा खुलताबाद तालुक्याचे पदाधिकारी साहेबराव मेंगाळ, बबन कातवारे, कैलास कातवारे, पांडुरंग कातवारे, राजु अवाले बाळु मधे, विष्णू मधे, संजय मधे, शासकीय आश्रम शाळा तिसगाव शिक्षक, शाम मधे, योगेश कातवारे, बुधा मेंगाळ, कैलास मेंगाळ, वाळुबा मेंगाळ सोमिनाथ कातवारे, कडुबा बांगारे,

तसेच ग्रामपंचायत कार्यालय निरगुडी बु/खु चे ऑपरेटर दीपक चांडे यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालयातील क्रांतीसुर्य धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT

P.G.DMLT

X-RAY

C.T.-SCAN

E.C.G.

Radiology

Physiotherapy

Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact : 9405109103

8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६

निवृत्तीवेतन धारकांसाठी कोषागारात विशेष शिबिराचे आयोजन

बीड, (भगवंत पाळवदे) : जिल्ह्यातील निवृत्तीवेतनधारक आणि कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या सोयीसाठी दि.१८ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालय, बीड येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात निवृत्तीवेतनधारकांना ऑनलाइन पद्धतीने हयात प्रमाणपत्र तयार करून दिले जाणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाबरस यांनी केले आहे. डिसेंबर २०२६ चे निवृत्तीवेतन वेळेत अदा होण्यासाठी हयात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. डिजिटल पद्धतीने हे दाखले सुलभतेने मिळावेत, यासाठी कोषागार कार्यालयामध्ये स्वतंत्र मदत कक्ष उभारण्यात आला आहे. शिबिराचा लाभ घेण्यासाठी येताना निवृत्तीवेतनधारकांनी आधार कार्ड, पीओपी क्रमांक आणि बँक खाते पासबुक सोबत आणणे अनिवार्य आहे. शिबिर सकाळी १० ते ५ या वेळेत सुरू राहणार आहे. निवृत्तीवेतनधारकांना मार्गदर्शन आणि तांत्रिक मदत करण्यासाठी कोषागार कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यामध्ये वरिष्ठ लेखापाल श्रीहरी घस, कनिष्ठ लेखापाल सचिन इंगळे, लेखा लिपिक अभिजीत काळे, धुरंचद गवते, अजय शेलार, वरिष्ठ लिपिक अशोक साखरे आणि शिपाई विशाल धांडे व जयेश लोढे यांचा समावेश आहे. हे सर्व कर्मचारी तीन दिवस निवृत्तीवेतनधारकांचे ऑनलाइन दाखले काढून देण्यासाठी कार्यरत राहणार आहेत. असेही कळविले आहे



दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

१.	पूर्ण पान (मल्टीकलर)	१००००/-
२.	अर्धे पान (मल्टीकलर)	५०००/-
३.	पाव पान (मल्टीकलर)	३०००/-
४.	शुभेच्छा जाहिरात	१०००/-

निवडणूक

गराम पंचायतीची निवडणूक लागलेली. मग काय ssss चिचच्या सावलीला..... वडाच्या झाडाखाली..... इसीच्या कट्ट्यावर..... चावडीच्या म्होरं..... आडाच्या कटड्यावर.....गल्ली बोळात, पाटलाच्या वाड्यावर चर्चेला ऊत आलेला.इटलनानाचा काळ जरा सुधारलेलाच म्हणाकी, टुकटुकी गीली अण् लाईट आली. तवापसून पिटाची गिरणी त्यांच्याकडच, फट फट वाजणारी फटफटी त्यांच्यातच, हलर त्यांच्यातच, दुबत्या गायी आन म्हशी त्यांच्यातच. शेतात वासरं जनावरं कंच न्हाई आसं न्हाईच. संमदी पिकं. शेतात पाणी भरपूर .ऊस, गहू ,हरभरा, जोंधळा,आव काय म्हणायचं ssss लक्ष्मी दारात उबाच.इतकी भरभराट झालेली की सांगूच नका. इटलनानाचा मदवा पोरगा त्याचं नाव केसवा. धाराशिवला जाऊन बरीच सालं शिकलेला. त्याचं बोलणं काय ssss त्यांचा रुबाब काय sss.गावात आला म्हंजी फटा फटा करीतच गाडी येयची. ह्या टायमाला मातर समदया पोरानी केस्वाला सरपंच करायचा चंगच बांदलेला. जिथं बगल तिथं केसवाच्या नावाची चर्चा. एका दिवसी वडाच्या झाडाखाली चार सा जनं तमाकु खात बसलेले. तुका नानानं जगतापाच्या कुशाला तमाकू मागितली. छाती वर करून कुशान तमाकू आन हिरवी चुन्याची डबी अशी रुबाबात फिकली. तीच तुका नानानं दूनी हातानं झेल्ली. एकाच्या नादानी एक अशा समद्यांनीच पान तमाकु खाल्ल.वाघमाऱ्याचा चंद्या दारूच्या नसेत डुलत डुलत पाय फरकांड्या मारीत जवळ आला. कुनब्याचा रामन्या, उगल्याचा नाण्या दोघांच्या मदी दूनी हातानी दोगाली सारून बसला. त्या दोगानी जागा द्यायच्या आत जागा बळकीवली. समद्याच्याच तोंडावर दारूचा भपकारा गेला. तवर तीन-चार जणांनी नाक तोंड वाकडी तिकडी किली. मग ईषय निघलाच. हुईल तर हुईल पण ह्या वक्ताला केसवाच सरपंच हुईल.त्यालाच सरपंच करायचा म्हणजी करायचा .तुकानाना मदीच म्हणला!!! ये sss येडझव्यानु हे काय नविनच? आर त्या पोराच्या तोंडावर मिसरूट तरी फुटलय का? उगच कायबी ssss.आर !!! सरपंच शिकला सवरलेला असावा .फटफटी चालविली म्हजी सरपंच व्हता येत नसतं.....आर गाव हाकायला अक्कल लागतिया का न्हाई!!! गाव गाडा चालवायचा म्हजी पोरा स्वराचं काम न्हाई.... गेल्या टायमाला जो सरपंच व्हता त्यालाच निवडून द्या की ssss.रामान्या म्हंला, आव नाना तुम्हाला काय माहितीये ssss .त्योव लै शिकलाय. वकीली शिकलाय वकीली!!!!उग हाय का काय? जा जा झक मारा करा त्यालाच करा सरपंच.तुकानाना रागात बुलून चालता झाला. हो नाही करीत एक एक निघून गेले. आठ दिवसावर फारम भरायचा दिवस आला. पाटलाच्या वाड्यावर संमदी पोरं जमा व्हायला लागली. बाया गड्याची यादी कागदावर लिहून काढली. गावातल्या बायाचे नवरे पुढ पुढ करीत व्हते. बाया मातर घरातच. कोणच्याच बायांली फारम भरलेला/ भरायचा कायबी माहित न्हवतं गड्याचीच तुरमंड. माझ्या बायकुचा की तुझ्या बायकुचा. चर्चेला रंग येत व्हता.. आज मातर लोकं वाड्यावर जमली की तात्याबा उठला. आणि बोल्ला. हेवका पोरानू तुम्हाला सांगतो. आता समद्या जातीत गड्या बायाचे फारम भरावे लागतेल.सरकारनी लै नियम काडलेत. आरद्या बाया आन आर्द गडी. समद्या जातीत एक एक माणसं, बाया घीऊन यादी बनवा. मग काय लगेच पहिली यादी फाडून मग दुसरी तयार कीली. आन फारम भरायच्या दिवशी सकाळी नारळ फुडून मगच फारम भरायला जाऊ अशी चर्चा झाली. मग काय पहिला नारळ कोंच्या देवाला फोडायचा म्हणून चर्चा सुरू झालं. धनगराचा केरबा म्हणला मारुतीलाच नारळ फोडू पहिला. मग देवीला फोडायचा. आन एक बक्र कापायचं. बकरं म्हणलं की समद्याच्या तोंडाला पाणी सुटलं.केरबाचा बाप तर हुरूळूनच गेला. पोरगं सरपंच व्हणार म्हणून त्याला दिवसांबी सपनं पडायला लागली. माणसं जमलेली बगुन धोतराचा खोशा सावरीत वाकडा झालेला रुमाल दुनी हातानी सरळ केला. पानाची पिचकारी मारली अनं चोथा डाव्या हाताच्या बोटानी काडून बाहीर फेकला.मग उभा राहून बोलला. आर एकच काय पाच बकरी देवाला कापूकी sss.असं म्हणल्यावर चंद्या उटला जोरानं घोस्ना दिली केसवा भाऊचा विजय असो ssss. जमलेल्या माणसाला लै जोस आला .घोषना झाल्यावर तर काय आरध गाव जमा झालं.मग काय!!झाली पोराची तयारी सुरू.समदी कामाला लागली. चार्जनं मीटा कुटाला लागली. तर दोन जण तडवळ्याच्या बाजारला गिली. पाच बोकड डोक्याच्या महावीर कडून ईकत घेतली... देवाला कापायची म्हणल्यावर तेनबी दाम कमीच घेतला. दिवस मावळोस्तर संमदी तयारी झालेली.मग का बोकडाची चर्चा गावभर पसरली. रात्री चार-सहा बायांनी काळं तिखट कुटून तयार केलं. त्याला आमी ईसरू म्हणतो.रामपाऱ्यात एक एक माणूस वाड्यावर जमत व्हय व्हता. वाजंत्र्याला सांगावा धाडला. तसं वाजंत्री झपाझप एका म्हागं येक पावलं टाकीत पिपाणी, ढोल, बेंडबाजा घेऊन आले. दारा म्होरं बसले. पोरांची गर्दी सुरू झाली. बाजूला पाच बकरी ब्या ब्यां करून वरडत व्हती.निगायची तयारी झाली. घराच्या उंबऱ्यावर उभारून कीशा म्हंला ये वाजंत्र्याहो आर फुका की sss...तस म्हणल्याबरूबर वाजंत्र्यानी वाजवायला सुरू केलं. टणक पाच पोरांनी एक एक बकर हातात धरलं .त्या बकऱ्याला हार घालून कुकू लावूलं.वाजवित गाजवीत देवीच्या मंदिराकड गेले. जातानी बकरी लावणाऱ्या मुलान्याला हाक मारायची राहून गिली.मधेंच धनगराचा मारत्या म्हणला आर मुलाण्याला बोलऊन घ्यार कोणी तरी. आसं म्हणल्यावर किंच्या म्हंला तुम्ही व्हा पुढ. मी आणतो जाऊन. लगेच किंच्यानं टोपीला हातानी सावरलं. धोतर हातात धरून पळतच मुलान्याच्या घरला गेला. दारात उभा राहून हाक मारली.ये ssss मामु आर चलकी ssss बकरी लावयचीत.मामू आता थकलेला व्हता.वय झालं व्हतं. तरुणपणात कसलबी बोकड आसलं तर, निस्त तोंडाला धरलं की बोकड ब्या करायच्या आत त्याचं नरडं सोडवायचा.निबर गडी व्हत.पर त्याच्या आंगाचा लै वकटा झ्यार वास यायचा .सारखी बकरी कापून त्याच्या आंगवर सार रगतचं असायचं.मग काय मामू कोपटातुंच होय होय म्हणून दोन सूऱ्या मळकटलेल्या कपड्यात गुंडाळून एका मागे एक देवीच्या मंदिराकडे आले. संमदी लोक मामुची वाट बघत थांबलेली.नारळ फोडला आन आता बकरी कापायची तयारी झाली. तेवढ्यात पोलीस गाडी हारण वाजवीतच मंदिरा म्होरं आली. ड्रायव्हरनं करकन बिरेक दाबलं.आन बकाबका पोलीस गाडीतून उतरले. समद्याच्या शेवटी पोलिसाचा साहेब खाली उतरला. काय हा परकार ??? म्हणून त्यांनी केसवाच्या बापाला ईचारल. केस्वाचा बाप हात जुडून काय नाही साहेब.पोरगा सरपंचकीला उभारलाय म्हणून बकरी कापायचेत. साहेब रागात भडकला. कोण कोण हैत त्या समद्यांना जीपीत कोंबा. धरा रं समदयाली. असं म्हणल्यावर पोरं बकऱ्याला सूडून धूम फरार झाली. माणसं भेदरली. थरथरली. बाया तोंडाला पदर लावून मागे सरल्या. काई काई लोक तर पळून गेले. एकदम जवळची माणसं थबकली. गर्बगळीत झाली. काय करावं समजना गेलं. काय झालं साहेब !!! आमचं काय चुकलं का ?म्हणून केरबाचा बाप साहेबाला बोल्ला. जे करताय ना sss ते चुकीचं हाय. हे समद बेकादेशीर करताय. म्हणून पोलिसाचा साहेब मोठ्याने शिव्या देऊन ओरडायला लागला. तेवढ्यात साहेबांचं पाय केरबाच्या वडिलांनी धरलं. साहेब म्हणले इलेक्शन चालू असताना तुम्हाला असले धंदे करता येणार नाहीत .तुमच्यावर केस होईल. असं म्हणल्यावर संमदी माणसं हादरली. केरबाच्या वडीलानी पाय धरले.काय बोलावं समजना. साहेब माफ करा. नाही नाही बोकडं कापणार न्हाई.बोकडाचा कार्यक्रम कॅन्सल करतो सायेब... म्हणून मापी मागितली.मग समद गाव म्हागारी फिरलं .ऐतखाऊ गिधाड्याच्या तोंडाला सुटलेलं पाणी तोंडातल्या तोंडात वाळून गेलं. तोंडावर चुलीचा पोतरा फिरावा तशी आवस्ता झालेली. आयाबायांना तर कायबी कळना. भराभरा करीत गल्लीबोळानी बाया पसार झाल्या. आली तशी गाडी निघून गेली. थोड्या येळानी एकेक करीत संमदी माणसं वाड्यावर जमली. ईसाबापू रागारागानं ईशीतून शिव्या देतच वाड्यावर निगाला. एका एकाला घोडा लावतो.नाही लावला तर नावाचा ईसा व्हणार न्हाई. जाणून-बुजून तुमी नागाच्या फण्याला हात लावलाय ना... तर मग ढसणारच. आमीबी बघून घिऊ अस म्हणत शिव्या देत देत वाड्यावर गेला. बघतो काय एका मागं एक माणसं जमली.रान तापलं.चर्चेला उधाण आलं.पोलिसात कुणी कागद दिला. संशय बळावला. विरोधी पार्टीच्या लोकांनी कागद दिला आसल.मग काल कोण कोण येरमाळ्याला गेलतं .चौकशी झाली. माजी सरपंचाचा पोरगा आन कुंडलनालाचा इट्या तेनी कागुद दिला म्हणून हेवढा खेळ झाला. हे कळल्यानंतर दहा-बारा पोरं काट्या कुराड्या घीऊन त्या दोन पोरास्नी हुडकायला निगले.तर तिकडच्यानिबी तयारी लावलेली व्हतीच. काट्याला काट्या, कूराडीला कुराडी भिडल्या.हानामाराचे आवाज गगणाल भिडले. जे व्हायचं तेच झालं. गाव माती, नातीगोती समदी धुरुलून गेली. गावची पांढरी माय लाल भडक झाली. राजकारणाचं व्हायचं तेच झालं....

लेखक:- भूमिपुत्र वाघ.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ नोव्हेंबर २०२६

विद्यार्थी : समाजाच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार

विद्यार्थी हा कोणत्याही राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक विकासाचा महत्त्वपूर्ण आधार असतो. राष्ट्राचे भविष्य कसे असेल, समाजाची प्रगती कोणत्या दिशेने होईल आणि आगामी पिढी कोणती जीवनमूल्ये स्वीकारेल, हे मोठ्या प्रमाणात आजच्या विद्यार्थ्यांच्या विचारांवर, शिक्षणावर आणि कृतीवर अवलंबून असते. विद्यार्थी जीवन हा केवळ पुस्तकी ज्ञान मिळविण्याचा, परीक्षा देण्याचा आणि पदवी संपादन करण्याचा कालखंड नसून व्यक्तिमत्त्व विकासाचा, वैचारिक जडणघडणीचा, सामाजिक वास्तव समजून घेण्याचा आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित करण्याचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. विद्यार्थ्यांच्या अधिकारांचे संरक्षण, शिक्षणातील समान संधी, विचारस्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि जागतिक बंधुभाव यांविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने दरवर्षी १७ नोव्हेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस विद्यार्थ्यांच्या संघर्षाचा, त्यागाचा आणि लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या बांधिलकीचा गौरव करणारा आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या वर्तमानातील समस्या समजून घेऊन त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याची प्रेरणा देणारा आहे.आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या इतिहासामागे स्वातंत्र्य, लोकशाही आणि मानवी प्रतिष्ठेसाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या संघर्षाची प्रेरणादायी कहाणी आहे. १९३९ मध्ये तत्कालीन चेकोस्लोव्हाकियावर नाझी जर्मनीचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. परकीय सत्तेच्या दडपशाहीविरुद्ध तेथील नागरिकांसह विद्यार्थ्यांनीही आवाज उठविला. २८ ऑक्टोबर १९३९ रोजी चेकोस्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त झालेल्या आंदोलनादरम्यान वैद्यकीय विद्यार्थी जान ओप्लेटल गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अंत्ययात्रेत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले. या घटनांमुळे संतप्त झालेल्या नाझी सत्तेने १७ नोव्हेंबर १९३९ रोजी प्रागमधील विद्यापीठांसह इतर शैक्षणिक संस्थांवर कठोर कारवाई केली. अनेक विद्यार्थ्यांना अटक करण्यात आली, नऊ विद्यार्थी नेत्यांना मृत्युदंड देण्यात आला आणि विद्यापीठे बंद करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या बलिदानाच्या स्मरणार्थ १७ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन म्हणून ओळखला जाऊ लागला. पुढे १९८९ मध्ये याच दिवशी प्राग येथे विद्यार्थ्यांनी लोकशाही आणि स्वातंत्र्याच्या समर्थनार्थ शांततापूर्ण आंदोलन केले. या आंदोलनातून चेकोस्लोव्हाकियातील मखमली क्रांतीला चालना मिळाली. त्यामुळे १७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थ्यांच्या धैर्याचा, संघर्षाचा आणि परिवर्तन घडविण्याच्या सामर्थ्याचा प्रतीक बनला आहे.या दिवसाचे महत्त्व समजून घेताना शिक्षणाच्या अधिकाराचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत मानवी अधिकार आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांच्या सार्वत्रिक जाहीरनाम्यातील कलम २६ मध्ये शिक्षणाच्या अधिकाराला मान्यता देण्यात आली आहे. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध असावे, प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे असावे तसेच उच्च शिक्षण गुणवत्तेच्या आणि समान संधीच्या तत्त्वावर उपलब्ध व्हावे, अशी त्यामागील भूमिका आहे. शिक्षणामुळे व्यक्तीला केवळ रोजगार मिळविण्याची क्षमता प्राप्त होत नाही, तर स्वतःच्या अधिकारांची जाणीव होते, सामाजिक विषमता समजते आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे बळ मिळते. शिक्षण व्यक्तीला अज्ञान, अंधश्रद्धा आणि शोषणाच्या बंधनातून मुक्त करण्याचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थिती, जात, धर्म, भाषा, लिंग, प्रदेश किंवा शारीरिक क्षमता यांमुळे कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी शासन आणि समाजाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.भारतीय समाजव्यवस्थेत शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम म्हणून विशेष महत्त्व आहे. भारतीय संविधानाने समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले आहे. संविधानातील अनुच्छेद २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मुळे या अधिकाराच्या अंमलबजावणीला कायदेशीर आधार मिळाला. मात्र, शिक्षणाचा अधिकार केवळ शाळेत प्रवेश मिळण्यापुरता मर्यादित नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षित शिक्षक, सुरक्षित शैक्षणिक वातावरण, ग्रंथालये, प्रयोगशाळा, क्रीडांगणे आणि आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शिक्षणव्यवस्थेने विद्यार्थ्यांच्या वैचारिक स्वातंत्र्याचा आदर करून त्यांच्यामध्ये प्रश्न विचारण्याची, चिकित्सक विचार करण्याची आणि स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता विकसित केली पाहिजे.भारतीय समाजातील शिक्षणविषयक परिवर्तनाचा विचार करताना महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे स्मरण करणे आवश्यक आहे. महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक विषमता दूर करण्याचे प्रभावी साधन मानले. स्त्रीशिक्षण आणि वंचित घटकांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य भारतीय समाजाच्या परिवर्तनातील महत्त्वपूर्ण योगदान आहे. सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक विरोध आणि प्रतिकूल परिस्थितीचा सामना करून मुलींच्या शिक्षणाचा मार्ग खुला केला. राजर्षी शाहू महाराज यांनी शैक्षणिक संधींचा विस्तार करून सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, संघटन आणि संघर्ष यांचा संदेश देत ज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक मुक्तीचा मार्ग दाखविला. या समाजसुधारकांच्या विचारांतून शिक्षणाचे सामाजिक महत्त्व स्पष्ट होते. शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण दूर करण्यासाठीही केला पाहिजे, ही त्यांची शिकवण आजच्या विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक आहे.आजच्या काळात विद्यार्थ्यांसमोर अनेक संधी उपलब्ध झाल्या असल्या तरी त्यांच्यासमोर विविध आव्हानेही उभी आहेत. शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण, शैक्षणिक खर्चात होणारी वाढ, ग्रामीण आणि शहरी भागांतील सुविधांमधील असमानता, बेरोजगारी, स्पर्धेचा वाढता ताण आणि सामाजिक विषमता हे प्रश्न विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम करीत आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम आणि डोंगराळ भागांतील विद्यार्थ्यांना वाहतूक, वीज, इंटरनेट, ग्रंथालये आणि प्रयोगशाळा यांसारख्या सुविधांचा अभाव जाणवतो. काही विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागते. मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीतही सामाजिक रूढी, आर्थिक मर्यादा, सुरक्षिततेचे प्रश्न आणि बालविवाह यांसारखे अडथळे काही भागांत कायम आहेत. त्यामुळे शिक्षणातील समानता निर्माण करण्यासाठी केवळ प्रवेशाच्या संधी उपलब्ध करून देणे पुरेसे नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक सुविधा आणि आर्थिक पाठबळ देणे गरजेचे आहे.आधुनिक काळातील ज्ञानाधिष्ठित समाजात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने शिक्षणाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलले आहे. संगणक, इंटरनेट, डिजिटल ग्रंथालये, आभासी वर्गखोल्या आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांमुळे ज्ञान मिळविण्याच्या संधी व्यापक झाल्या आहेत. जगातील विविध विद्यापीठांचे अभ्यासक्रम, संशोधन साहित्य आणि शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना उपलब्ध होत आहेत. ऑनलाइन शिक्षणामुळे भौगोलिक अंतराचे बंधन काही प्रमाणात कमी झाले आहे. विशेषतः मुक्त आणि दूरस्थ शिक्षण पद्धतीमुळे नोकरी करणारे, ग्रामीण भागातील, गृहिणी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि शिक्षणात खंड पडलेले विद्यार्थी पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतात. तथापि, डिजिटल साधनांची अनुपलब्धता, इंटरनेटची मर्यादित सुविधा आणि तांत्रिक कौशल्यांचा अभाव यांमुळे डिजिटल दरी निर्माण झाली आहे. त्यामुळे डिजिटल शिक्षणाचा विस्तार करताना सर्व विद्यार्थ्यांना आवश्यक साधने आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांसमोर नवीन संधी आणि आव्हाने निर्माण झाली आहेत. माहितीचे संकलन, भाषांतर, लेखन, विश्लेषण, संशोधन आणि समस्या सोडविणे यांसारख्या कामांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरू शकते. मात्र, या साधनांचा वापर करताना विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विचारशक्तीला आणि सर्जनशीलतेला दुय्यम स्थान देता कामा नये. उपलब्ध माहितीची सत्यता तपासणे, विविध संदर्भांचा अभ्यास करणे आणि स्वतःचे स्वतंत्र निष्कर्ष मांडणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे ज्ञानप्राप्तीचे साधन असावे, ज्ञानाचा पर्याय नव्हे. डिजिटल माध्यमांवरील चुकीची माहिती, अफवा, सायबर छळ, वैयक्तिक माहितीची चोरी आणि सामाजिक माध्यमांचे व्यसन यांपासून विद्यार्थ्यांनी सावध राहिले पाहिजे. तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण, जबाबदार आणि नैतिक वापर करण्याची क्षमता विकसित करणे ही आधुनिक शिक्षणाची महत्त्वाची गरज आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये मानसिक आणि भावनिक आरोग्यालाही विशेष महत्त्व आहे. आजच्या स्पर्धात्मक वातावरणात विद्यार्थ्यांवर शैक्षणिक यश, परीक्षेतील गुण, प्रवेश प्रक्रिया, रोजगार आणि कुटुंबाच्या अपेक्षा यांचा मोठा दबाव असतो. अनेकदा विद्यार्थ्यांची तुलना इतरांशी केली जाते. त्यामुळे न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव, तणाव, निराशा आणि एकाकीपणाची भावना निर्माण होऊ शकते. परीक्षेतील अपयश म्हणजे जीवनातील अपयश नव्हे, ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची आवड, क्षमता, शिकण्याची गती आणि जीवनातील उद्दिष्टे वेगवेगळी असतात. त्यामुळे गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्याऐवजी त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्यांचा, सर्जनशीलतेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विचार केला पाहिजे. शैक्षणिक संस्थांमध्ये समुपदेशन, मार्गदर्शन, क्रीडा, योग, ध्यान आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य अधिक सक्षम होऊ शकते.विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. शिक्षक हे केवळ अभ्यासक्रम शिकविणारे नसून विद्यार्थ्यांच्या विचारांना दिशा देणारे, त्यांच्या क्षमतांना प्रोत्साहन देणारे आणि जीवनमूल्यांची जाणीव करून देणारे मार्गदर्शक असतात. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात विश्वासाचे, आदराचे आणि संवादाचे नाते असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, मतभिन्नता व्यक्त करण्याची आणि नव्या कल्पना मांडण्याची मोकळीक मिळाली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या चुका केवळ शिक्षा करण्याचे कारण न मानता त्यातून शिकण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. शिक्षणसंस्थांनी सुरक्षित, समावेशक आणि भेदभावमुक्त वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. जातीय, धार्मिक, भाषिक, आर्थिक किंवा लैंगिक आधारावर होणारा भेदभाव विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला बाधा पोहोचवतो. त्यामुळे शिक्षणसंस्था या समानता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेची मूल्ये प्रत्यक्ष अनुभवता येतील अशी केंद्रे बनली पाहिजेत.विद्यार्थी हा समाजापासून वेगळा घटक नसून समाजाचा सक्रिय आणि संवेदनशील भाग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच सामाजिक प्रश्नांचेही भान ठेवले पाहिजे. गरिबी, बेरोजगारी, निरक्षरता, जातीय विषमता, स्त्री-पुरुष असमानता, बालमजुरी, पर्यावरणाचा ऱ्हास, व्यसनाधीनता आणि भ्रष्टाचार यांसारख्या प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, युवक मंडळे आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेच्या विविध संधी उपलब्ध होतात. स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, जलसंवर्धन, साक्षरता अभियान, आरोग्य जनजागृती आणि ग्रामविकासाच्या उपक्रमांमध्ये सहभाग घेतल्यास विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते. समाजातील वंचित, दुर्बल आणि उपेक्षित घटकांच्या समस्या समजून घेण्याची संवेदनशीलता विकसित होते. शिक्षणाचा खरा उपयोग तेव्हाच सिद्ध होतो, जेव्हा प्राप्त ज्ञानाचा लाभ व्यक्तीबरोबरच समाजालाही होतो.लोकशाहीच्या बळकटीकरणामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही ही केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसून ती विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, सहिष्णुता, समानता, संवाद आणि परस्पर आदर या मूल्यांवर आधारलेली असते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन निवडणुका, विद्यार्थी प्रतिनिधी मंडळे, चर्चासत्रे आणि वादविवाद स्पर्धांच्या माध्यमातून लोकशाही प्रक्रियेचा अनुभव घेतला पाहिजे. मतभिन्नता असणे ही लोकशाहीची स्वाभाविक बाब आहे. मात्र, मतभिन्नतेचे रूपांतर द्वेष, हिंसा किंवा वैयक्तिक संघर्षात होता कामा नये. विद्यार्थ्यांनी विवेकपूर्ण विचारांच्या आधारे आपली मते मांडावीत आणि इतरांच्या मतांचाही आदर करावा. विद्यार्थ्यांचा आवाज हा समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण असतो. त्यांच्या प्रश्नांना आणि विधायक सूचनांना महत्त्व देणारा समाजच अधिक लोकशाहीवादी आणि प्रगत होऊ शकतो.विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करताना कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षणालाही प्राधान्य देणे आवश्यक आहे. आज पदवी प्राप्त करणे एवढेच रोजगार मिळविण्यासाठी पुरेसे राहिलेले नाही. बदलत्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांकडे संवादकौशल्य, नेतृत्वक्षमता, निर्णयक्षमता, संघभावना, तांत्रिक ज्ञान आणि समस्या सोडविण्याची क्षमता असणे आवश्यक आहे. उद्योजकता, स्वयंरोजगार, व्यावसायिक प्रशिक्षण, संशोधन आणि नवोपक्रम यांना शिक्षणव्यवस्थेत महत्त्व दिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने शिक्षण न घेता रोजगारनिर्मिती करण्याची क्षमताही विकसित केली पाहिजे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्यविकास, व्यावसायिक शिक्षण, संशोधन आणि अनुभवाधारित अध्ययन यांना महत्त्व देण्यात आले आहे. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी कमी करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी उद्योग, व्यवसाय, संशोधन संस्था आणि समाज यांच्याशी समन्वय साधला पाहिजे.पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीनेही विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. हवामान बदल, वाढते तापमान, पाण्याचे दुर्भिक्ष, जंगलतोड, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या समस्या संपूर्ण मानवजातीसमोर आव्हान म्हणून उभ्या आहेत. या समस्यांचे परिणाम भविष्यातील पिढ्यांना अधिक तीव्रतेने भोगावे लागू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जाणीव आणि निसर्गाप्रती संवेदनशीलता निर्माण करणे आवश्यक आहे. पाणी वाचविणे, ऊर्जेचा काटकसरीने वापर करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, वृक्षारोपण करणे आणि सार्वजनिक स्वच्छतेमध्ये सहभाग घेणे अशा छोट्या कृतींतून मोठे परिवर्तन घडविता येते. विद्यार्थ्यांनी शाश्वत विकासाची संकल्पना समजून घेऊन पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारली पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे.आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाच्या निमित्ताने जागतिक स्तरावरील विद्यार्थी एकात्मतेचाही विचार करणे गरजेचे आहे. जागतिकीकरणामुळे विविध देशांतील विद्यार्थ्यांना एकमेकांच्या भाषा, संस्कृती, ज्ञानपरंपरा आणि जीवनपद्धती समजून घेण्याच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. विद्यार्थी विनिमय कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, संशोधन सहकार्य आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांमुळे जागतिक बंधुभावाची भावना विकसित होऊ शकते. जगातील कोणत्याही भागात युद्ध, हिंसाचार, नैसर्गिक आपत्ती किंवा राजकीय अस्थिरता उद्भवल्यास त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होतो. अशा परिस्थितीत शिक्षण खंडित झालेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे. भाषा, धर्म, वंश आणि राष्ट्रीयत्व यांतील भिन्नता बाजूला ठेवून ज्ञान, शांतता आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारित विद्यार्थी एकात्मता निर्माण झाली पाहिजे.विद्यार्थ्यांनी स्वतःच्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे. शिक्षण घेणे, ज्ञान संपादन करणे, वेळेचे नियोजन करणे, शिक्षकांचा आणि पालकांचा आदर करणे, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, सामाजिक सलोखा राखणे आणि कायद्याचा आदर करणे ही विद्यार्थ्यांची महत्त्वपूर्ण कर्तव्ये आहेत. त्याचबरोबर अंधश्रद्धा, जातीयवाद, धार्मिक कट्टरता, हिंसक प्रवृत्ती आणि सामाजिक द्वेष यांपासून दूर राहून वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. सामाजिक माध्यमांवरील प्रत्येक माहिती खरी मानण्याऐवजी तिची सत्यता तपासणे, अफवा पसरविण्यापासून दूर राहणे आणि डिजिटल माध्यमांचा समाजहितासाठी वापर करणे हीदेखील आजच्या विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या यशाचा विचार करताना कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्या विकासाचाही विचार केला पाहिजे.आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन हा विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा, संघर्षाचा, अधिकारांचा आणि सामाजिक योगदानाचा सन्मान करणारा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने शिक्षणसंस्था, शिक्षक, पालक, शासन आणि समाज यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, समान संधी, सुरक्षित वातावरण, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, संशोधनाच्या सुविधा आणि रोजगाराभिमुख कौशल्ये उपलब्ध करून दिली पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकून घेणारी, त्यांच्या मतांचा आदर करणारी आणि त्यांच्या क्षमतांना वाव देणारी शिक्षणव्यवस्था निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थ्यांचे यश केवळ परीक्षेतील गुण, पदव्या किंवा मिळविलेल्या नोकऱ्यांवर मोजता कामा नये, तर त्यांच्या विचारांची व्यापकता, सामाजिक संवेदनशीलता, नैतिकता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समाजासाठी योगदान देण्याची वृत्ती यांवरही मोजले पाहिजे.विद्यार्थी हा केवळ उद्याचा नागरिक नसून आजच्या समाजाच्या परिवर्तनातील सक्रिय घटक आहे. त्याच्या विचारांमध्ये नवेपणा, कृतीमध्ये ऊर्जा आणि स्वप्नांमध्ये परिवर्तनाची ताकद असते. इतिहासातील विद्यार्थ्यांच्या संघर्षाने जगाला स्वातंत्र्य, लोकशाही आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व पटवून दिले आहे. त्या संघर्षाचा वारसा जपत आजच्या विद्यार्थ्यांनी ज्ञान, विवेक, समता, बंधुता आणि मानवता या मूल्यांचा स्वीकार केला पाहिजे. शिक्षणातून स्वतःचा विकास साधताना समाजातील वंचित घटकांच्या प्रगतीसाठीही योगदान दिले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देणे, त्यांच्या प्रश्नांना समजून घेणे आणि त्यांच्या क्षमतांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण सक्षम विद्यार्थी घडविणे म्हणजे सक्षम समाज घडविणे आणि सक्षम समाजाची निर्मिती करणे म्हणजे समृद्ध, समताधिष्ठित, लोकशाहीवादी व प्रगत राष्ट्राच्या भविष्याची पायाभरणी करणे होय. हाच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनाचा खरा संदेश आणि या दिवसाच्या उत्सवामागील व्यापक उद्देश आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com